कृपया प्रसिद्धीसाठी ২८ ऑगस्ट २०१७

# व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल स्पर्धेस गायक कलाकारांचा मोठा प्रतिसाद

२९व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये यंदा 'मि. व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल अवॉर्ड'चे उदयराज सूर्यवंशी व 'मिस व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल अवॉर्ड'च्या समृद्धी पाटेकर हे दोघे मानकरी ठरले आहेत. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे झालेल्या या अभिनव गायन स्पर्धेचे आमदार मेधा कुलकर्णी, संगीतकार इनॉक डॅनियल, संयोजिका अनुराधा भारती, परिक्षक ज्येष्ठ तबलावादक राजू जावळकर आणि ज्येष्ठ गायक शरद करमरकर, प्रशांत बोरकर, प्रफुल्ल देशपांडे इत्यादींच्या हस्ते दीप प्रज्ज्वलाने सुरूवात झाली. याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे संगीतकार इनॉक डॅनियल म्हणाले की, 'या स्पर्धेत बक्षिस मिळो न अथवा मिळो, सर्वच स्पर्धक गायकांनी गाण्याची गुणवत्ता कशी उंचावत राहिल याकडे लक्ष दिले पाहिजे. यासाठी सूर, ताल आणि प्रगटीकरण यामध्ये प्राविण्य मिळवले पाहिजे.'

या स्पर्धेत एकूण २५० हून अधिक गायक कलाकारांनी सहभाग घेतला होता. ४० वर्षाखालील वयोगटात स्त्री व पुरूष आणि ४० वर्षावरील वयोगटात स्त्री व पुरूष अशा ४ गटात ही स्पर्धा पार पडली. गेल्या दोन दिवस सर्वच स्पर्धकांची प्राथमिक चाचणी घेऊन त्यातील ३० स्पर्धक अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले. आज त्यातील प्रत्येकी चार गटात प्रथम, द्वितिय व तृतीय असे एकूण बारा स्पर्धक विजयी झाले. तसेच उत्तेजणार्थ दोन बक्षीसे देण्यात आली. प्रत्येक गटात प्रथम क्रमांकास दोन हजार रूपये, द्वितिय क्रमांसास दीड हजार रूपये, तृतीय क्रमांकास एक हजार रूपये आणि उत्तेजणार्थ ८०० रूपये अशी बक्षीसाची रक्कम होती. याचे संयोजन पुणे फेस्टिव्हलतर्फे अनुराधा भारती यांनी केले. तर परिक्षक म्हणून ज्येष्ठ तबलावादक राजू जावळकर आणि ज्येष्ठ गायक शरद करमरकर यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत स्पर्धक गायकांनी हिंदी चित्रपटातील स्वतः निवडलेल्या तीन गाण्यांपैकी एक गाणे म्हणायचे व परिक्षकांनी सांगितलेल्या या तीन पैकी एक गाणे म्हणायचे, अशी ही स्पर्धा होती. परिक्षकांनी प्रत्येकास दिलेल्या गुणांनुसार विजेते घोषीत करण्यात आले. त्यातील सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या उदयराज सूर्यवंशी व समृद्धी पाटेकर या गायक कलाकारांस 'व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल' अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

**स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे –**

**४० वर्षांखालील पुरूष गट –** प्रथम क्रमांक : उदयराज सूर्यवंशी, द्वितीय क्रमांक : सुमीत कर्णिक, तृतीय क्रमांक : चैतन्य जोगाईकर.

**४० वर्षांवरील पुरूष गट –** प्रथम क्रमांक : विनोद कुलकर्णी, द्वितीय क्रमांक : मारूती पवन, तृतीय क्रमांक : प्रमोद सुभेदार / दीपक कुलकर्णी

**४० वर्षांखालील महिला गट –** प्रथम क्रमांक : समृद्धी पाटेकर, द्वितीय क्रमांक : स्नेहा गायकवाड, तृतीय क्रमांक : सृष्टी सोंडकर / मृणाल रणधीर

**४० वर्षांवरील महिला गट –** प्रथम क्रमांक : स्वरधा कुलकर्णी, द्वितीय क्रमांक : गीता जोगळेकर, तृतीय क्रमांक : विदुला पंडित

**उत्तेजणार्थ बक्षिसे :** अनघा जोशी आणि आशुतोष सुरसजे.

या स्पर्धेवेळी स्मिता लाटे यांनी निवेदन केले. स्वागत, प्रास्ताविक व आभार संयोजिका अनुराधा भारती यांनी केले. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे मुख्य संयोजक कृष्णकांत कुदळे, मोहन टिल्लू, रविंद्र दुर्वे, अतुल गोंजारी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रल्हाद सुंदरकर इत्यादी उपस्थित होते. रसिक प्रेक्षकांनी कार्यक्रमास मोठी गर्दी केली होती.

कळावे.

**आपला स्नेहांकित**

प्रवीण प्र. वाळिंबे

माध्यम समन्वयक

९८२२४५४२३४

**फोटोओळ** :

**१) डीसीएस – ७२३३ = पुणे फेस्टिव्हल अंतर्गत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झालेल्या 'व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल' गीतस्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलाने करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून परिक्षक ज्येष्ठ गायक शरद करमरकर, प्रमुख पाहुणे संगीतकार इनॉक डॅनियल, आयसीसी केबलच्या शितल अरपदी, संयोजीका अनुराधा भारती आणि आमदार मेधा कुलकर्णी.**